**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. ४.**

**मी शपथेवर कथन करतो की,**

**नाव** – दत्तात्रय महादेव शिंदे.

**वय** – ५६ वर्ष, **व्यवसाय** – सहाय्यक फौजदार,

**नेमणूक**– पोलिस ठाणे, गडहिंग्लज, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर.

**सरतपास– श्री. एस. आर. सावंत, सरकारी वकील.**

**१.** मी दि.०६.०१.२०२४ रोजी आजरा पोलिस ठाणे अंतर्गत गवसे बीट अंमलदार पदावर कार्यरत होतो. आंबाडे हे गावे गवसे गावा अंतर्गत येत असल्यामुळे सदर गुन्हा ठाणे अंमलदारांनी तपासकामी माझ्याकडे दिला होता. आता मला त्याबाबतचा लेखी आदेश दाखवला. त्याला **नि. क्र. पी.३७** देण्यात येतो. मला तपासकामी आदेशा सोबत फिर्याद, फिर्यादी जबाब, ऑनलाईन खबर व इतर कागदपत्रे मिळाली होती.

२. त्यानंतर मी दि.०७.०१.२०२४ रोजी फिर्यादी व तिच्या पतीने आंबाडे गावातील त्यांच्या घरासमोरील दाखवलेल्या रस्त्यावर दोन पंचांसमक्ष घटनास्थळ पंचनामा करुन एक मेसकाठी जप्त केली होती. आता मला तो पंचनामा दाखवला, त्यावरती माझी व पंचांची स्वाक्षरी असून त्यातील मजकूर बरोबर आहे. त्याला नि. क्र. पी.३१ देण्यात आलेला आहे. मी सदर गुन्हयाच्या तपासामध्ये जप्त केलेली काठी मालखान्यात जमा केली होती. आता मला त्याची पावती दाखवली, तिला **नि. क्र. पी.३८** देण्यात येतो. मी सदर जप्त केलेली काठी दाखवल्यास ओळखू शकतो. आता मला दाखवलेली काठी तीच असून तिला वस्तू क्र.अ देण्यात आलेला आहे.

३. त्यानंतर मी तपासकामी साक्षीदारांचे जबाब त्यांच्या सांगण्या प्रमाणे नोंदवले होते. मी आरोपींना न्यायालयात हजर राहण्या बाबत नोटीसा देऊन फिर्यादीचे वैद्यकीय प्रमाणपत्र मिळवले होते. मला तपासाअंती आरोपींनी फिर्यादीला मेसकाठीने मारहाण केल्याचे निष्पन्न झाल्यामुळे मी त्यांच्या विरोधात दोषारोपपत्र दाखल केले आहे. आरोपी आज न्यायालयात हजर आहेत.

**सरतपास पुर्ण.**

**उलट तपास– श्री. के. जी. पाटील वकील.**

४.    मी सन २०१८ ते जून-२०२४ पर्यंत आजरा पोलिस ठाण्यात कार्यरत होतो. मी घटना घडलेल्या दिवशी पोलिस ठाण्यात कार्यरत होतो. मला त्या रात्री फिर्यादी पोलिस ठाण्यात आल्याचे आठवत नाही. मला ठाणे अंमलदारांनी गुन्हा दाखल झाल्यानंतर त्याबाबत सांगितले होते. मला तक्रार दाखल झाल्याच्या दुस-या दिवशी सदर गुन्हा तपासकामी माझ्याकडे दिल्याचे समजले होते. सदर गुन्हयाचा तपास दि.०७.०१.२०२४ रोजी माझ्याकडे आला आहे. सदर गुन्हा मी सकाळ सत्रात पोलिस ठाण्यात आल्यानंतर माझ्याकडे तपासकामी देण्यात आला होता. त्यावेळी फिर्यादी अथवा तिच्या वतीने इतर कोणीही पोलिस ठाण्यात हजर नव्हते.

५.    मी गुन्हा तपासकामी मिळाल्यानंतर सर्वप्रथम घटनास्थळ पंचनामा केला होता. पंच तेजस कुराडे माझ्या ओळखीचा नाही. मी त्याला फोन करुन बोलावून घेतले नव्हते. फिर्यादीने त्याला फोन करुन बोलावले होते. मी पाला जळलेल्या ठिकाणाचा पंचनामा केला नव्हता. असे काही घडले नाही की, मला फिर्यादीच्या पत्नीने सदर गुन्हयातील वस्तू क्र.अ ची मेसकाठी काढून दिली होती. पंच तेजस कुराडे ने मला घटनास्थळी आल्यावर कशासाठी बोलावले आहे याबाबत विचारले नव्हते.

६.    मी पंचनामा पुर्ण झाल्यानंतर १४.०० वाजता फिर्यादीचा पतीचा घटनास्थळी जबाब नोंदवला आहे. मी पंचनामा करतेवेळी सोबत संगणक, लॅपटॉप किंवा प्रिंटर घेऊन गेलो नव्हतो. मी फिर्यादीच्या पतीचा जबाब हाताने नोंदवला नव्हता. मी सर्व साक्षीदारां कडून घटनास्थळी माहिती घेतल्यानंतर तेथे जबाब नोंदवण्याची सुविधा नसल्यामुळे पोलिस ठाण्यात येऊन संगणकावरती नोंदवले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी साक्षीदारांचे जबाब संगणकावरती तयार करताना त्यांना पोलिस ठाण्यात बोलावले नव्हते. मला साक्षीदार कोणत्या दिवशी बोलावले होते ते आठवत नाही.

७.    मी पंचनामा करण्यासाठी माझ्या मोटारसायकलने गेलो होतो. मी त्याबाबत स्टेशन डायरीला नोंद घेतली होती. मी एकटाच पंचनाम्यासाठी गेलो होतो. घटनास्थळी माझ्या व्यतिरिक्त इतर कोणीही पोलिस कर्मचारी नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी दि.०७.०१. २०२४ रोजी पंचनाम्यासाठी घटनास्थळी गेलो नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलिस ठाण्यात बसून पंचनामा तयार केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी

साक्षीदारांचे जबाब माझ्या सोयीप्रमाणे पोलिस ठाण्यात संगणका वरती तयार केले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी सदर गुन्हयाचा संपूर्ण तपास न करता अपु–या माहितीच्या आधारे चुकीचा तपास केलेला आहे.

**उलट तपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

दिनांक – २३.०७.२०२६.

आजरा.

(आर. पी. थोरे)

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, आजरा.